Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २८९ • RNI : MAHMAR/2023/87818 • रविवार दि.२८ जुलै २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# लाडकी बहीण योजनेसाठी बक्कळ पैसा निधी नसल्याच्या बातम्यांत तथ्य नाही

## अजित पवारांचे विरोधकांच्या टीकेवर स्पष्टीकरण

**मुंबई (वृत्तसंस्था)–राज्यातील माता–भगिनी–मुलींच्या आर्थिक स्वातंत्र्य, स्वावलंबन, पोषण व सर्वांगीण सक्षमीकरणासाठी, मान, सन्मान, स्वाभिमान वाढवण्यासाठी रक्कम खर्च करण्याची राज्य शासनाची तयारी आहे असे म्हणत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लाडकी बहीण योजनेवर होत असलेल्या टीकेवर स्पष्टीकरण दिले आहे. तसेच निधी नसल्याच्या बातम्यांत तथ्य नाही असेही ते म्हणाले आहेत. त्यांनी यासंदर्भात एक ट्विट केले आहे.खरे तर, या योजनेची घोषणा झाल्यापासून सातत्याने विरोधकांकडून यावर टीका केली जात आहे. सरकारवर आधीच कर्ज असताना या योजनेसाठी पैसा कुठून आणणार असा सवाल उपस्थित केला जात होता. तसेच नुकतेच योजनेला वित्त विभागाचा विरोध असल्याची माहितीही समोर आली होती. मात्र या सर्व बातम्या कपोलकल्पित असल्याचे अजित पवार म्हणाले आहेत.**



''महाराष्ट्राचा उपमुख्यमंत्री आणि राज्याचा अर्थ व नियोजन मंत्री म्हणून मी स्वतःच 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' योजना राज्याच्या वर्ष २०२४–२५ च्या अतिरिक्त अर्थसंकल्पात सादर केली आहे. वित्त व नियोजन, सर्व संबंधित विभाग तसेच राज्य मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतरच या योजनेची घोषणा मी राज्याच्या अर्थसंकल्पात केली.चालू आर्थिक वर्षात योजनेसाठी आवश्यक एकूण ३५ हजार कोटी रुपयांच्या संपूर्ण रकमेची तरतूद यावर्षीच्याच अर्थसंकल्पात केली आहे. त्यामुळे या योजनेसाठी पैसा कुठून आणणार?, हा प्रश्नच उद्भवत नाही. महाराष्ट्रासारख्या आर्थिक संपन्न राज्याला एवढी रक्कम खर्च करणे शक्य आहे.राज्यातील माता–भगिनी–मुलींच्या आर्थिक स्वातंत्र्य, स्वावलंबन, पोषण व सर्वांगीण सक्षमीकरणासाठी, मान, सन्मान, स्वाभिमान वाढवण्यासाठी ही रक्कम खर्च करण्याची राज्य शासनाची तयारी आहे. त्यामुळे 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'ला या राज्यातील कुणाचाही विरोध असण्याचे कारण नाही, असूच शकत नाही.काही प्रसार माध्यमांमध्ये प्रसिद्ध झालेल्या, या योजनेला वित्त विभागाचा विरोध असल्याच्या बातम्या कपोलकल्पित, वस्तुस्थितीशी, विसंगत, राजकीय हेतूने प्रेरित आहेत. प्रसार माध्यमांनी अशा बिनबुडाच्या बातम्या देणे कृपया थांबवावे. राज्यातील कुणाचाही अशा बातम्यांवर विश्वास बसणार नाही, याची मला खात्री आहे. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या यशस्वीतेसाठी अधिकाधिक भगिनींना यात सहभागी करून घेण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करूया.... असे अजित पवार यांनी आपल्या ट्विटमध्ये म्हंटले आहे.

## थोडक्यात

### पक्षाने संधी दिल्यास पश्चिममधून लढणार

**छत्रपती संभाजीनगर–** गद्दारांना धडा शिकवण्यासाठी यंदाची विधानसभा निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतल्याची घोषणा उद्धव ठाकरे गटाचे नेते चंद्रकांत खैरे यांनी केली आहे. २५ जुलै रोजी शिवशंकर कॉलनीत उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त इंदुरीकर महाराजांचे कीर्तन झाले. या वेळी आपण अजूनही रेसमध्ये आहोत हे खैरे यांनी दाखवून दिले. विशेष म्हणजे पक्षाबाहेरच्या गद्दारांबरोबर पक्षांतर्गत गद्दारांकडेदेखील त्यांचा रोख असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.खैरे यांचा लोकसभेत पराभव झाला होता. त्यामुळे ते राजकीयदृष्ट्या बॅकफूटवर गेले होते. या पार्श्वभूमीवर खैरे यांनी पुन्हा एकदा विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची घोषणा केली आहे. माझी पश्चिम विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्याची इच्छा आहे. मला गद्दारांना पाडायचे आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे यांनी आदेश दिल्यास मी संजय शिरसाट यांना पाडण्यासाठी निवडणूक लढवेन, असे ते म्हणाले.हे.

### यूपीएच्या काळात मोदी–शहांवर षडयंत्र रचले गेले

**मुंबई–**गृहमंत्री अमित शहा यांनी माझ्यावर 'भ्रष्टाचाराचा सुभेदार' असं म्हणत टीका केली. पण ज्यांनी ही टीका केली, त्या देशाच्या गृहमंत्र्यांना कायद्याचं उल्लंघन केलं म्हणून तडीपार करण्यात आलं होतं. गुजरात दंगल प्रकरणी कोर्टाने तडीपार केले, ती व्यक्ती आज देशाच्या संरक्षणाची जबाबदारी सांभाळतोय, अशी टीका एनसीपी एसपी पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी एका जाहीर कार्यक्रमात केली. त्यावर आता भाजप नेत्यांकडून पलटवार केला जात आहे. केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी शरद पवार यांना प्रत्युत्तर देत त्यांनी माफी मागितली पाहिजे, अशी मागणी केली.

### आरक्षणला धक्का लागला तर मी राजकारणातून संन्यास घेईल

**भंडारा–**राज्यात आरक्षणावर सध्या चांगलेच राजकारण तापले आहे. याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते प्रफुल्ल पटेल यांनी मोठे विधान केले आहे. आरक्षणला धक्का लागला तर मी राजकारणातून संन्यास घेईल, असे म्हणत प्रफुल्ल पटेल यांनी विरोधकांच्या प्रचाराला प्रत्युत्तर दिले आहे. आरक्षणाला कोणत्याही प्रकारचा धक्का लागला तर मला कुठल्याही पदावर आणि राजकारणात राहण्याचा अधिकार नाही. म्हणूनच मी सर्वांचा त्याग करेल, असे प्रफुल्ल पटेल यांनी म्हटले आहे. या देशात आरक्षण हे संविधानात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिले आहे. त्यामुळे आरक्षणाला कोणीही धक्का लावू शकत नाही, त्याचा मूळ ढाचा कोणीही बदलू शकत नसल्याचे प्रफुल पटेल यांनी म्हटले आहे.

### अखेर पंकजा मुंडे सभागृहात परतणार

**भंडारा–**नुकत्याच झालेल्या विधानपरिषद निवडणुकीत नवनिर्वाचित झालेल्या सदस्यांचा २८ जुलै रोजी शपथविधी होणार आहे. उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे या नवनिर्वाचित सदस्यांना शपथ देणार आहेत. यामध्ये भाजपच्या ज्येष्ठ नेत्या पंकजा मुंडे यांचाही समावेश आहे. २०१९ मध्ये पराभूत झाल्यानंतर त्या मुख्य राजकारणापासून बाजूला झाल्या होत्या. त्यानंतर अनेकदा विधान परिषद किंवा राज्यसभेवर त्यांची वर्णी लागेल, अशी अपेक्षा होती. मात्र, तसे झाले नाही. अखेर लोकसभा निवडणुकीतही त्यांचा पराभव झाला. त्यानंतर आता पक्षाने त्यांची विधान परिषदेवर वर्णी लावली आहे. विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी १२ जुलै रोजी मतदान पार पडले होते. या वेळी निवडून आलेल्या सर्व सदस्यांना २८ जुलै रोजी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्याकडून शपथ दिली जाणार आहे. यामध्ये योगेश टिळेकर, पंकजा मुंडे, परिणय फुके, अमित गोरखे, सदाभाऊ खोत, भावना गवळी, कृपाल तुमाने, शिवाजीराव गर्जे, राजेश विटेकर, मिलिंद नार्वेकर, प्रज्ञा सातव या नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी पार पडणार आहे.

# जिल्ह्यात आणखी किती लोकांचा बळी जाऊ देणार?

## पोलीस अधीक्षकांना आमदार किशोर जोरगेवार यांचा सवाल

### सतर्क राहत गुन्हेगारीवर आळा घाला, जिल्हा पोलीस अधीक्षक यांना सुचना

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

पिस्तुल घेऊन गुन्हेगार सर्रास वावरत असेल तर ही बाब कायदा सुव्यवस्थेसाठी चिंतेची आहे. वर्दळीच्या ठिकाणी भरदिवसा गोळीबार केल्या जात आहे. गुन्हेगारांवर पोलिसांचा धाक राहिला नाही का असा प्रश्न उपस्थित करत जिल्हात आणखी किती बळी जाऊ देणार आहात असा प्रश्न आमदार किशोर जोरगेवार यांनी जिल्हा पोलिस अधिक्षक मुमक्का सुदर्शन यांना विचारला असुन रेकॉर्डवर असलेल्या गुन्हेगारांवर कार्यवाही करत वाढत्या गुन्हेगारीवर आळा घालण्याच्या सूचना केल्या आहे.





शहरातील वाढती गुन्हेगारी आणि पोलिस विभागाने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्यासाठी जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालयात आमदार किशोर जोरगेवार यांनी बैठक आयोजित केली होती. या बैठकीत आमदार किशोर जोरगेवार यांनी सदर सुचना केल्या आहे. यावेळी जिल्हा पोलिस अधिक्षक मुमक्का सुदर्शन, पोलीस निरीक्षक पंकज बनसोडे, पोलीस निरीक्षक शैलेश ठाकरे, माता महाकाली महोत्सव समितीचे सचिव अजय जयस्वाल, अल्पसंख्याक विभागाचे युथ शहर अध्यक्ष राशेद हुसेन, शहर संघटक करणसिंह बैस आदींची उपस्थिती होती.

शहरातील वाढत्या गुन्हेगारीवर अंकुश लावण्यासाठी आमदार किशोर जोरगेवार यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. मागील काही दिवसांत शहरात गुन्हेगारीच्या घटनांनी डोके उचलले आहे. काही घटनांमध्ये पिस्तूलचा वापर करण्यात आला असून, ही गंभीर बाब आहे. पोलीस विभागाने सतर्क राहून, ही शस्त्रे शस्त्रे चंद्रपूरात कशी येतात, याची सखोल चंद्रपूरात दाखल कशी होतात याची चौकशी करून वाढत्या गुन्हेगारीवर अंकुश लावण्यासाठी गुन्हेगारीत लिप्त असलेल्यांवर कठोर कार्यवाही करावी, अशा सूचना जोरगेवार यांनी केल्या आहेत.बैठकीत मागील काही दिवसांत घडलेल्या गंभीर गुन्हेगारी घटनांची तपशीलवार चर्चा करण्यात आली. विशेषतः पिस्तूलचा वापर करून झालेल्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकारच्या गुन्हेगारीला थांबवण्यासाठी पोलीस विभागाने सतर्क राहणे आवश्यक आहे. शस्त्रे चंद्रपूरात कशी येतात, याची सखोल चौकशी करण्याची आवश्यकता असल्याचे यावेळी आमदार किशोर जोरगेवार म्हणाले. गुन्हेगारीत लिप्त असलेल्या व्यक्तींवर कठोर कार्यवाही केली जावी. अशा गुन्हेगारांना तातडीने अटक करून न्यायालयात सादर करावे, मोठी घटना घडण्याआधीच गुप्तचर विभागा मार्फत त्याची माहिती पोलिस विभागाला मिळत असते. त्यामुळे गुप्तचर यंत्रणा पून्हा सक्षम करावी, आलेल्या माहितीकडे दुर्लक्ष न करता त्याची सत्यता तपासण्यात यावी अशा सुचनाही यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी केल्या आहे.अवैध व्यवसाय आणि त्यातून निर्माण होणाऱ्या गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी पोलीस विभागाने ठोस पावले उचलण्याची आवश्यकता आहे. वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्याच्या दिशेनेही प्रयत्न करणे आवश्यक आहे. वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात. गस्त वाढवणे, संदिग्ध व्यक्तींवर लक्ष ठेवण्याच्या सूचनाही यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक यांना केल्या आहे.

# मरणानंतरही थांबत नाहीत नरक यातना

## सन्मासनभूमीचा रस्ता नसल्याने,मृतदेहांची अवहेलना



**वैराग । प्रतिनिधी**

येथील जुना पंढरपूर रोडच्या व लिंगायत स्मशान भूमीकडे जाणाऱ्या रस्त्याची अवस्था अतिशय दयनीय झाली आहे. रस्त्या अभावी पावसाळ्यात व रात्री स्मशानभूमीकडे अंत्ययात्रेसाठी जाणे म्हणजे मृतदेहाबरोबरच जिवंत माणसाला देखील नरक यातना भोगाव्यात अशी स्थिती आहे.

वैराग शहराची लोकसंख्या पाहता जुना पंढरपूर रोडकडे जाणारी स्मशानभूमी आहे. या मशानभूमीकडे जाण्यासाठी ना रस्ता आहे. ना रस्त्याच्या कडेला लाईट आहेत. याच मार्गावर वैराग पोलीस ठाणे व पशुवैद्यकीय दवाखाना देखील आहे. पशुवैद्यकीय दवाखान्याच्या पुढील बाजूला नागरी वसाहत देखील आहे. परंतु स्मशानभूमीकडे जाण्यासाठी पाऊलवाटेचा रस्ता आहे. पक्क्या रस्त्या अभावी पावसाळ्याच्या दिवसात एखाद्या व्यक्तीच्या अंत्यविधी करण्यासाठी प्रेत घेऊन जाणे म्हणजे महाकठीण होऊन बसले आहे. त्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सोसावा लागत आहे. लाडोळे रोड कडे जाणाऱ्या लिंगायत स्मशानभूमीच्या रस्त्यालाही खड्डेच खड्डे असून याच रस्त्यावर असणाऱ्या ओढ्यावर पावसामुळे पाणी आल्यावर अंत्यविधीला प्रेत घेऊन जाणे अशक्यप्राय असल्याचे दिसून येते. वैराग ग्रामपंचायतचे नगरपंचायतीमध्ये रूपांतर झाले आहे. परंतु सोयी सुविधा पासून नागरिक दूर आहेत. त्यामुळे नागरिकातून संताप व्यक्त केला जात आहे.

# रविवार ला अंगणवाडी कर्मचारी बचत गट प्रतिनीधी व कामगार मेळावा

**चिमूर । प्रतिनिधी**

गरीबोंका दाता अशी ओळख असलेल्या अजातशत्रु, समाजवादी नेते गोर गरीबांचे कैवारी स्व. भाई रहेमतुल्ला यांचे



२९ व्या स्मृतीदिन प्रित्यर्थ अंगणवाडी कर्मचारी, बचत गट प्रतिनिधी व कामगार मेळाव्याचे आयोजन शेतकरी भवन, हजारे पेट्रोल पंप समोर, २८ जुलै रोज रविवार सकाळी ११.०० वाजता करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी अध्यक्षा जि.प. भंडारा तथा कार्याध्यक्षा, अंगणवाडी कर्मचारी सभा (महाराष्ट्र) किसनाताई भानारकर ,मुख्य अतिथी विरोधी पक्ष नेता विजय वडेट्टीवार,सत्कामूर्ती गडचिरोली - चिमूर लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉ. नामदेवराव किरसान , प्रमुख पाहुणे माजी अध्यक्ष जि. प. चंद्रपूर डॉ. सतिश वारजूकर, माजी सरपंच ग्रा. प. नागभीड जहांगीर कुरेशी, सामाजिक कार्यकर्ता लालाजी मेश्राम, सामाजीक कार्यकर्ता तळोधी (ना) शकील रहमेतुल्ला शेख आदी उपस्थित राहणार आहे.परिसरातील नागरीकांनी कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन अंगणवाडी ताई व बचत गट प्रतिनिधीं सहभागी व्हावे, असे आव्हाहन जिल्हा अध्यक्ष अंगणवाडी कर्मचारी सभाचे आवाहन इम्रान कुरेशी, माधुरी रमेश विर, प्रभा विश्वनाथ चामटक, रलता राजु देवगडे ललीता सोनुले विद्या वारजुकर

संयोगिता गेडाम अन्नपुर्णा हिरादेवे ,रोशनी चंदेल व तालुका बचत गट आहार पुरवठा संघटना यांनी केले आहे.

# शिवसेनेच्या वतीने आज मूल येथे भव्यरोजगार मेळावा

**मुल । प्रतिनिधी**

मूल तालुक्यात शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. बल्लारपूर विधानसभा मतदारसंघातील शिक्षित आणि कुशल तरुण तरुणींना यशस्वी करिअर सुरु करण्याची संधी मिळावी या उद्देशाने शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना जिल्हाप्रमुख संदिप गिऱ्हे यांच्या संकल्पनेतून २८ जुलैला भव्य रोजगार मेळावा २०२४ चे आयोजन करण्यात आले आहे.

रोजगार मेळावात देशातील ५० पेक्षा अधिक उद्योग, सेवा आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील नामवंत कंपन्या या रोजगार मेळाव्यात सहभागी होणार आहे. पाच हजार पेक्षा अधिक पदांसाठी थेट मुलाखती घेतल्या जाणार असून पात्र उमेदवारांना तत्काळ नियुक्ती पत्र दिले जाणार आहे.या रोजगार मेळाव्यात बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील युवकांकरिता संधी उपलब्ध झालेली असून,विधानसभा क्षेत्रातील प्रत्येक तालुक्यामध्ये मुलाखत पूर्व प्रशिक्षण पार पडल्यानंतर २८ जुलै रोजी मुल येथील नवभारत विद्यालय येथे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. रोजगार मेळाव्यामध्ये उमेदवारांना मुलाखत आणि लगेच नियुक्तीपत्र प्रदान करून देशातील नामवंत कंपन्यांमध्ये रोजगाराची संधी शिवसेनेच्या माध्यमातून उपलब्ध होणार आहेत.उमेदवारांना मेळाव्यामध्ये सहभागी होण्याकरिता ऑफलाइन व ऑनलाईन दोन्ही पद्धतीने नोंदणी करता येणार असून क्यूआर कोडद्वारा उमेदवाराना संपूर्ण नोंदणी फॉर्म भरता येणार आहे. रजिस्ट्रेशन लिंक वरून रोजगार मेळाव्या संदर्भात सविस्तर माहित प्राप्त होणार आहे. इच्छुक उमेदवारांनी लवकरात लवकर नोंदणी करून सहभाग घ्यावा,असे आवाहन शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख संदिप गिऱ्हेयांनीकेलीआहे.

# राज्यातील नदीजोड प्रकल्पांना केंद्राने वेग द्यावा:मुख्यमंत्री एकनाथ शिंद

**नवी दिल्ली–**मराठवाड्यासारख्या दुष्काळग्रस्त भागाला पाणी पुरविणे आणि नदीजोड प्रकल्पांतून राज्यात सर्वदूर पाणी पोहचवून राज्य सजलाम सुफलाम करणे हे आपले उद्दिष्ट्य असून केंद्राने यासंदर्भातील प्रकल्पांना वेग द्यावा, अशी मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केली. राष्ट्रपती भवन येथे अशोक मंडपात नीति आयोगाच्या नवव्या नियामक परिषदेत ते बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोंदी यांच्या अध्यक्षतेखाली ही परिषद पार पडली. या परिषदेत विविध राज्यांचे मुख्यमंत्री, केंद्रशासित प्रदेशांचे नायब राज्यपाल यांच्यासह नीति आयोगाचे पदसिद्ध सदस्य, केंद्रीय मंत्री आणि नीति आयोगाचे उपाध्यक्ष उपस्थित होते.



सह्याद्रीचा राखणदार



# गिरोलीच्या शेतकऱ्यांना दिलासा: 'जेबीएसटी' मुळे चार दशकांची प्रतीक्षा संपली

## नाल्यावर पूल बांधल्याने दीड किलोमीटरचा फेरा वाचला

### दहा लाखांचे काम झाले केवळ तीन लाखांत

या नाल्यावरील पूल हा गावकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा होता. त्यामुळे लोकप्रतिनिधी व प्रशासनाकडे मागणी केल्यावर या पुलाकरिता साधारणतः दहा लाखांच्या खर्चाचा अंदाज बांधला जात होता. परंतु बजाज इन्स्टिट्यूटचे अभियंता वामन तिमांडे यांनी आपल्या कल्पकतेतून स्वस्तात, पण टिकाऊ अशा पुलाचे स्ट्रक्चर तयार करून ते पूर्णत्वास नेले, केवळ तीन लाखांत हे काम पूर्ण झाले असून, यात दहा टक्के लोकसहभाग आहे.

### अन् ती म्हातारी धावत आली...

नाल्यातूनच आम्हा शेतकरी व शेतमजुरांचे आवागमन होते. या नाल्याच्या पुरात गावातील दोन व्यक्ती व एक म्हातारी वाहून गेली होती; पण सतर्कतेने तिघेही बचावले. आता गावात पुलाचे बांधकाम होणार असून, त्यासाठी लोकसहभाग आवश्यक आहे. असे गावात माहीत होताच ती म्हातारी धावत आली आणि तिने इच्छेनुसार आर्थिक मदत केली. या पुलाकरिता साऱ्यांनीच हातभार लावल्याने मोठी समस्या तातडीने सुटली याचे सर्वांनाच समाधान आहे.

–विकास जीवतोडे, नागरिक.

### शेतकऱ्यांच्या डोळ्यांतील पाणी पुसले

शेतकऱ्यांकरिता हा जिव्हाळ्याचा प्रश्न होता. तब्बल चाळीस वर्षांपासून या पुलाच्या मागणीकरिता शेतकऱ्यांनी शासकीय कार्यालयाचे उंबरठे झिजविले तसेच लोकप्रतिनिधींपुढेही मागणी लावून धरली; पण कोणीही शेतकऱ्यांच्या मदतीला धावून आले नाही. अखेर शेवटचा पर्याय म्हणून बजाज सेवा ट्रस्टकडे समस्या मांडली आणि त्यांनी तातडीने पुलाचे बांधकाम करून शेतकऱ्यांची समस्या सोडविली. त्यामुळे खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या डोळ्यातील पाणीच पुसले गेले आहे.

– नितीन ढगे, नागरिक.

शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये संपन्नता निर्माण करणे, त्यांचे आशेचे किरण जागृत करणे यासाठी आमची संस्था नेहमीच प्रयत्नरत आहे, त्यांच्या समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने पाहणी करून कामाला सुरुवात केली. तेथे लहान पुलाची निर्मिती करून शेतकऱ्यांचा मार्ग सुकर केला. सध्या शेतकरी दुचाकी व पायदळ जाऊ शकतात पण, बैलबंडी नेऊ शकणार नाही. –

संजय भार्गव, मुख्य कार्यकारी अधिकारी, जमनालाल बजाज सेवा ट्रस्ट, वर्धा

**झडशी | वार्ताहर**

परिसरातील झडशी येथील टेकड्यांच्या पायथ्याशी वसलेले गिरोली (ढगे) हे हजार लोकवस्तीचे गाव. या गावातील नागरिकांचा शेती हाच मुख्य व्यवसाय. या गावालगत खोल नाला वाहत असून, या नाल्यातूनच शेतकऱ्यांची वहिवाट असायची. नाल्याला पूर आला की एक ते दीड किलोमीटरचा फेरा मारून शेतात जावे लागत. त्यामुळे या नाल्यावर पूल बांधून द्यावा, अशी मागणी गावकरी गेल्या ४० वर्षांपासून करीत होते. पण, ना लोकप्रतिनिधींना जाग आली, ना प्रशासनाला. अखेर गावकऱ्यांचा लोकसहभाग आणि जमनालाल बजाज सेवा ट्रस्टच्या पुढाकारातून पुलाचे बांधकाम पूर्णत्वास गेल्याने शेतकऱ्यांचा फेरा वाचला.





**गांव करी ते राव न करी**

गिरोली (ढगे) या गावालगतच्या नाल्यापलीकडे जवळपास दोनशे हेक्टर शेती असून, या शेतात जाण्याकरिता शेतकरी व शेतमजुरांना हा नाला पार करून जावे लागत. अन्यथा एक ते दीड किलोमीटरचा फेरा करून आपापले शेत गाठावे लागत होते. त्यामुळे गावकरी गेल्या ४० वर्षांपासून लोकप्रतिनिधी व जिल्हा प्रशासनाकडे नाल्यावर पूल बांधून देण्याची मागणी करत होते. ग्रामपंचायतीने ठराव घेऊन प्रशासनला दिला परंतु मागणी पुर्ण झाली नाही. अखेर गावातील एक होत करु तरुण नितीन ढगे याने या नाल्यावर पुल बांध्याशिवा शांत बसायच नाही. असा विडाच उचलाला अनेक प्रयत्न केल्यानंतर तो जमनालला अनेक प्रयत्न केल्या नंतर तो जमनालला बजाज सेवा ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय भार्गव यांना भेटला. त्यांच्या समोर ही समस्या मांडली आणि त्यांच्या टीमने गावाला भेट देऊन नाल्याची पाहणी केली. कामाला लागणार खर्च. पुलाचे स्ट्रक्चर आर्दींवर काम सुरु झाले. नागरिकांनीही या कामाकरिता तातडीने दहा टक्के लोकसहभाग दिला आणि अवघ्या तीन आठवड्यात या नाल्यावर युनिक पुल साकार झाला. नुकताच आषाढी एकादशीला या पुलाचे उद्घाटन झाले असून यावरुन वहिवाट सुरु झाली. या उद्घाटन कार्यक्रमाला जमनालला बजाज सेवा ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय भार्गव, गटप्रमुख राजेंद्र खर्चे, बजाज बजाज इन्स्टिट्यूटचे अभियंता वामन तिमांडे, उमेश गडकरी, अविनाश अंबुलकर, सुशांत हांडे, यशवंत मुंगुले व गावकरी नितीन ढगे, चंदू भोंगाडे, विलास जीवतोडे, सचिन ढगे, सुधीर वडे, चंदू उकुडे, नंदा ताकसांडे, शीतल जीवतोडे, शुभांगी तेलतुमडे यांच्यासह गावकरी उपस्थित होते

# तनुश्री धर्मरावबाबा आत्राम यांच्यातर्फे पोलिस भरतीच्या उमेदवारांच्या निवाऱ्याची व्यवस्था

**गडचिरोली | प्रतिनिधी**

रविवारी २८ जुलैला गडचिरोली येथे पोलिस भरतीची लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे. मात्र, सध्या जोरदार पाऊस सुरु असल्याने उमेदवारांची गैरसोय होऊ नये म्हणून तनुश्री धर्मरावबाबा आत्राम यांनी गडचिरोली शहरात ठिकठिकाणी मोफत निवास आणि भोजनाची सोय केली आहे.

राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांच्या मार्गदर्शनात तनुश्री धर्मरावबाबा आत्राम आणि सार्वत्रिक बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. नवेगाव कॉम्प्लेक्स येथील सृष्टी सेलिब्रेशन हॉल, गडचिरोली येथील पटेल मंगल कार्यालय व इंदिरानगर येथील स्यप्नील मडावी अकॅडमी येथे ही व्यवस्था करण्यात आली आहे.

**लेखी परिक्षेसाठी येणाऱ्या युवक, युवतींनी तनुश्री आत्राम यांच्या जनसंपर्क कार्यालय (८२७५८७७१७७), स्वप्नील मडावी (९५२९९३३८९३), उमेश उईके (८९९९९५६५७३), कुणाल कोवे (९२८४६५८५४७), सतीश कुसराम (७४९८४६२०७९) तसेच जयश्री येरमे व रेखा तोडासे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन तनुश्री धर्मरावबाबा आत्राम यांनी केले आहे.**



### रविवारी २८ जुलैला लेखी परीक्षा

गडचिरोली पोलिस दलातर्फे ९१२ पोलिस शिपाई पदांकरिता मैदानी चाचणी घेण्यात आली. या चाचणीत उत्तीर्ण झालेल्या ६०११ उमेदवारांची लेखी परीक्षा रविवारी २८ जुलैला गडचिरोली शहरातील ११ परीक्षा केंद्रांवर घेण्यात येणार आहे. त्यासाठी उमेदवारांनी सकाळी ८ वाजता संबंधित परीक्षा केंद्रावर उपस्थित राहायचे आहे. 'सामान्य अध्ययन' या विषयाचा पहिला पेपर सकाळी १०.३० ते दुपारी १२ वाजता, तर गोंडी व माडिया भाषेचा दुसरा पेपर दुपारी १.३० ते ३ वाजतापर्यंत घेण्यात येणार आहे. पात्र उमेदवारांनी आपापले प्रवेशपत्र डाउनलोड करावे. प्रवेशपत्र आणि ओळखपत्र असणाऱ्या उमेदवारांना बॉयोमेट्रीक पद्धतीने नोंदणी परीक्षा कक्षात प्रवेश देण्यात येईल. बॅग, मोबाईल किंवा अन्य इलेक्ट्रानिक्स वस्तू घेऊन परीक्षा कक्षात जाता येणार नाही, असे पोलिस विभागातर्फे सांगण्यात आले आहे.

# कौसडी येथे पाचशे झाडांची लागवड



**कौसडी | प्रतिनिधी**

जिंतूर तालुक्यातील कौसडी येथे दिनांक २४ जुलै बुधवार रोजी पाचशे झाडांची लागवड करण्यात आली आहे. येथील आमेना मस्जिद परिसर, हनुमान मंदिर परिसर, पिर मुमतोजी साहेब दर्गा परिसर, महादेव मंदिर परिसर, ख्वाजा कमालोद्दीन साहेब दर्गा कब्रस्तान परिसर जामा मस्जिद परिसर यासह इतर ठिकाणी पाचशे झाडांची लागवड करण्यात आली. या झाडांमध्ये करंजी,सागवान, लिम यासह इतर जातींच्या झाडांचा समावेश आहे.

यावेळी मुजाहेद कादरी, माजी सरपंच शेख सलीम उपसरपंच रवी देशमुख लिंबाजीराव इखे,अन्वर बेग,पाशा पठाण, अन्वर पटेल,समीर पठाण,बालासाहेब बहिरट, ज्ञानेश्वर बारवकर,हरिभाऊ खैरे, अब्दुल सलाम, शेख अल्ताफ, शेख रशीद, आसिफ पठाण, शाकीर पटेल, भगवान लगड, लुखमान नाईक, सय्यद अख्तर, सद्दाम शेख, सय्यद कौसर हे उपस्थित होते


## भविष्याचा वेध घेणारा अर्थसंकल्प

# शेतकरी,महिला,युवा अन् गरिबांना केंद्रस्थानी ठेवून केंद्राची भविष्यावर मोठी गुंतवणूक-देवेंद्र फडणवीस

**मुंबई (वृत्तसंस्था)**

केंद्रीय अर्थसंकल्प शेतकरी, महिला, युवा व गरीब या ४ प्रमुख घटकांवर भर देण्यात आला आहे. या अर्थसंकल्पाद्वारे देशाच्या भविष्यावर मोठी गुंतवणूक करण्यात आली असून, त्याद्वारे एक मजबूत भारत उदयास येण्यास मदत होईल, असे मत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी केंद्रीय अर्थसंकल्पावर भाष्य करताना व्यक्त केले आहे.केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मंगळवारी देशाचा अर्थसंकल्प सादर केला. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना देवेंद्र फडणवीस यांनी हा अर्थसंकल्प भविष्याचा वेध घेणारा असल्याचे स्पष्ट केले. केंद्राचा अर्थसंकल्प भारताच्या भविष्यावर मोठी गुंतवणूक करणार आहे. त्यात शेतकरी, महिला, युवा व गरीब या ४ प्रमुख घटकांवर भर देण्यात आला आहे. केवळ घोषणांचा वर्षाव न करता भविष्याचा वेध घेणारे हे बजेट आहे. त्यात भविष्यातील विकास लक्षात घेऊन समतोल गुंतवणुकीवर भर देण्यात आला आहे, असे फडणवीस म्हणाले.

फडणवीस पुढे म्हणाले, सद्यस्थितीत जगभरातील देश अर्थव्यवस्थेशी संबंधित मुद्यांवर संघर्ष करत आहेत. त्या स्थितीत भारतीय अर्थव्यवस्थेतील ८.२ टक्क्यांची दाखवलेली वाढ ही अत्यंत महत्त्वाची व भारतीय अर्थव्यवस्थेची ताकद दाखवून देणारी आहे. उत्पादन क्षेत्रात खूप मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. जगात महागाईचा दर दुहेरी आकड्यात पोहोचला असताना भारतात तो ६.७ टक्क्यांवरून ५.४ टक्क्यांवर घसरला आहे. हे देखील अत्यंत महत्त्वाचे आहे.सामाजिक कल्याणाच्या योजनांच्या विकासाचा दरही महागाईच्या दरापेक्षा दुप्पट आहे. याचा अर्थ सरकार सामाजिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत आहे. ही गुंतवणूक जीडीपीच्या ७.८ टक्के आहे. आरोग्य क्षेत्रावरील खर्च २०१७-१८ च्या तुलनेत जवळपास दुप्पट झाला आहे. तो आता अडीच लाख कोटींहून ५.८५ लाख कोटींवर पोहोचला आहे. म्हणजे सरकारने या दोन्ही क्षेत्रातील गुंतवणूक खूप मोठी गुंतवणूक केली आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.



ते पुढे म्हणाले की, सध्या वित्तीय तूट कमी होत आहे. बँकांचा एनपीए २.८ टक्क्यांवर आला आहे. हा १५ वर्षांतील सर्वात कमी दर आहे. लाभार्थ्यांच्या खात्यांतही ४० लाख कोटींहून अधिकची रक्कम जमा करण्यात आली आहे. हे भारतीय अर्थव्यवस्था मजबूत होत असल्याचे द्योतक आहे.। अर्थसंकल्प भारताच्या भविष्यावर मोठी गुंतवणूक करणारा आहे. त्यात शेतकरी, महिला, युवा, गरीब या ४ घटकांवर भर देण्यात आला आहे. सरकारने शेतीसाठी अनेक योजना आणल्यात. यात नैसर्गिक शेतीपासून नव्या किसान क्रेडिट कार्डापर्यंत व शेती क्षेत्रातील पायाभूत सोयीसुविधा निर्माण करण्यापासून विपणनापर्यंत मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्यात आली आहे, असे फडणवीस म्हणाले.रोजगाराच्या क्षेत्रात महाराष्ट्र सरकारने अँप्रेटिसची एक योजना सुरू केली होती. आता त्याच धर्तीवर केंद्राने एक योजना सुरू केली आहे. यामुळे जवळपास साडेचार कोटी तरुणांना रोजगार प्राप्त होण्यास मदत होईल. केंद्राने जवळपास १०० नवे क्लस्टर तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे उत्पादन, आयटी, सर्विसेस आदी क्षेत्रांत रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. ग्रामविकासाच्या क्षेत्रात २ लाख कोटींहून अधिक गुंतवणूक केली जात आहे. ३ कोटी अतिरिक्त घरे बांधण्याचा निर्णयही केंद्राने घेतला आहे. आदिवासी बांधवांसाठी जनजातीय उन्नत ग्रामोन्नती अभियान हाती घेण्यात आले आहे. आदिवासींच्या विकासासाठी हे अभियान ६३ हजार गावांमध्ये राबवण्यात येईल. सरकार पायाभूत सुविधा क्षेत्रांतही तब्बल ११ लाख कोटींची गुंतवणूक करणार आहे. याचाही जनतेला मोठा लाभ होईल, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# वीर जवान सलाम तुमच्या बलिदानाला !

## कारगिल विजय दिनी रासपने केला वीर पत्नीचा सन्मान

**सोलापूर | प्रतिनिधी**

कारगिल विजय दिवस हा भारताच्या इतिहासातील सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखी घटना आहे. आजपासून २५ वर्षांपूर्वी पाकिस्तानी घुसखोरांनी भारतीय सीमा ओलांडून भारताच्या हद्दीतील अनेक ठिकाणी घुसखोरी करून कब्जा करण्याचा प्रयत्न झाला होता. हे भारताच्या लक्षात आले. त्यानंतर २६ जुलै या दिवशी भारतीय जवानांनी पाकिस्तानी सैन्याला धूळ चारून कारगिलच्या पर्वतरांगांवर आपल्या देशाचा तिरंगा पुन्हा एकदा फडकावला. यामुळे दरवर्षी २६ जुलै रोजी 'कारगिल विजयी युद्ध दिवस' म्हणून सर्वत्र देशभर साजरा केला जातो. हा दिवस देशासाठी लढणाऱ्या आणि देशसेवेच्या संरक्षणासाठी बलिदान दिलेल्या वीर शूरवीर जवानांची आठवण करुन देणारा हा स्वर्ण दिवस आहे.

याच कारगिल विजयी दिनी पोथरे येथील वीर पत्नी संगीता भारत कांबळे यांचे पती वीर सैनिक शहीद भारत कोंडींबा कांबळे रा.अमळनेर ता.पाटोदा जि बीड यांना देशसेवा करत असताना जम्मु काश्मीर या ठिकाणी १९९८ रोजी वीर मरण आले. त्या नंतर संगीता कांबळे, मुलगा विकी कांबळे हे पोथरे येथे वास्तव्यास आहेत.२६ जुलै रोजी कारगिल विजयी दिनानिमित्त वीर सैनिक पत्नी संगीता कांबळे यांचा २६ जुलैला पोथरे येथे राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी रासप जिल्हा सरचिटणीस अंगद देवकते, सामाजिक कार्यकर्ते नरेंद्र सिंह ठाकूर, रासप माजी संपर्क प्रमुख दिपक कडू, सुरेश शिंदे, अजित गोसावी, बाळासाहेब टकले, विकास मेरगळ इत्यादींच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला.



**आमचे पती देशसेवेत देशासाठी शहीद झाल्यामुळे आमचा आधार संपलेला आहे. शासना कडून आम्हाला पाच एकर जमिंनी वितरीत करून देतो म्हणून शब्द दिला परंतु अद्यापही आम्हाला कुठेही जमिंनी मिळालेल्या नाहीत. आमच्या व्यथा शासन दरबारी कोणीही ऐकून घेत नाहीत यांचे दू:ख खूप वाटते. आमच्या मुलांना शासकीय सेवेत घेतले पाहिजे. तसेच सर्व शासकीय योजनांचा लाभ विना-अटी शिवाय वीर पत्नीला प्राधान्याने मिळायला हवा.**
**संगीता भारत कांबळे – वीर सैनिक पत्नी.**

## सावित्रीबाई फुले आधार योजने अंतर्गत अर्ज स्वीकारण्यास ३१ जुलैपर्यंत मुदतवाढ

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेअंतर्गत सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात उच्च शिक्षणाच्या द्वितीय, तृतीय व चतुर्थ वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना अर्ज करण्याकरिता / स्वीकारण्याकरिता ३१ जुलै २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच याबाबतची निवड प्रक्रिया राबवून निवड यादी जाहीर करण्याकरिता १५ दिवसांची मुदत वाढ देण्यात येत आहे. त्यानुसार निवड यादी जाहीर करण्याचा सुधारित दिनांक १६ ऑगस्ट २०२४ असा राहील, याची सर्वांनी नोंद घ्यावी असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या सहाय्यक संचालक आशा कवाडे यांनी केले.



## नवनिर्वाचित खासदार डॉ.नामदेवराव किरसान यांनी घेतली दादापाटील चोखारे याची सदिच्छा भेट


**चंद्रपूर | प्रतिनिधी**

गडचिरोली लोकसभा क्षेत्राचे लोकप्रिय नवनिर्वाचित खासदार माननीय डॉ. नामदेवराव किरसान साहेब यांनी आज चंद्रपूर येथील नियोजित कार्यक्रमाअगोदर चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष दादापाटील चोखारे यांचे घरी सदिच्छा भेट दिली.

यावेळी खासदार डॉ. नामदेवराव किरसान यांचा शाल, विठ्ठल रुक्माईची मूर्ती भेट देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष दादापाटील चोखारे याचेसह गडचिरोलीचे जिल्हाध्यक्ष महेंद्र ब्राह्मणवाडे, महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ मर्यादित, महाराष्ट्र संचालक तथा कृषी उत्पन्न बाजार समिती चंद्रपूरचे माजी सभापती, जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम सभापती, काँग्रेस नेते दिनेशभाऊ चोखारे, काँग्रेसचे नेते महेश मेंढे, ओबीसीचे नेते सचिन राजुरकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक गणेश आवारी, रोशन पचारे, प्रेमानंद जोगी , प्रमोद बोरीकर, कृष्ण मसराम यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.



## लोकजागरच्या पाठपुरवठ्याला यश



**दानापुर | प्रतिनिधी**

ज.प. उर्दू शाळेला ९ वा वर्ग मंजूर व्हावा अशी मागणी लोकजागर च्या माध्यमातून करण्यात आली होती.

सीईओ श्रीमती वर्षा मीना मॅडम यांनी दखल घेऊन तात्काळ मंजुरी दिली त्याबद्दल त्यांचे आभार मानले व त्यांचा लोकजागर व ग्रामपंचायत गावकरी मंडळींच्या वतीने सत्कार सुद्धा केला.

## ग्रामगीता महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सुरू केली स्वच्छता मोहीम

**चिमूर | प्रतिनिधी**

येत्या पाच दिवसा पासून सुरू असलेल्या सतत मुसळधार पावसामुळे चिमुर येथील बराचसा परिसर पाण्याखाली आला व जनजीवन विस्कळीत झाले. सतत होत असलेल्या पावसामुळे चिमूर तालुक्यातील पूर-प्रवण क्षेत्रात पुराची शक्यता नाकारता येत नाही, ही बाब लक्षात घेऊन ग्रामगीता महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे तालुक्यातील पूर-प्रवण क्षेत्रात स्वच्छता आणि जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमा अंतर्गत नाल्या साफ करणे, कोसळलेल्या घरांचे ढिगारे काढणे, साचलेल्या पाण्याच्या निचरा करण्याची व्यवस्था करणे, झुडपे साफ करणे आदी कामे केली जात आहेत.

पावसामुळे रस्त्यावरती, नाल्यांमध्ये काही घरांच्या अंगणामध्ये सर्वत्र घाण पसरली असून नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अशावेळी स्वच्छता मोहीम राबविणे अत्यंत महत्त्वाचे होते. अशावेळी ग्रामगीता महाविद्यालया चे प्राचार्य व त्यांची चमू तसेच विद्यार्थी यांनी स्वच्छता मोहीम हातात घेऊन एक स्तुत्य उपक्रम सुरू केला आहे त्यामुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

ग्रामगीता महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. हुमेश्वर आनंदे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाच्या रा.से.यो. विभागाच्या प्रयत्नातून वरील कार्य केले जात आहे. या मोहिमेत रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ. बिजनकुमार शील, शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. संदीप सातव, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. निलेश ठवकर, प्रा. विवेक माणिक, डॉ. मृणाल वऱ्हाडे, डॉ. सुमेध वावरे, प्रा. प्रज्ञा खोब्रागडे आदी प्रामुख्याने या स्वच्छता मोहिमेत कार्यरत आहेत. रा.से.यो. स्वयंसेवकांचे नेतृत्व कु. गौरी चंदनखेडे, दिलराजसिंग अंधेरेले, सार्थक देंगे, संदीप जीवतोडे आणि करण मजुमदार आदी विद्यार्थी करीत आहेत.



## सिकलसेल रुग्णांना कायमस्वरूपी अपंगत्वाचे प्रमाणपत्र द्या

### बहुजन मेडिकोज असोसिएशनची मागणी



**मूल | रोहित कामडे**

सिकलसेल हा आजार आनुवंशिक असल्याने या आजाराचे राज्यात हजारो रुग्ण असून अनेक रुग्ण उपचार घेतं आहे सिकलसेल हा आजार कायमस्वरूपी असल्याने तो दिव्यांग श्रेणीत मोडतो पण कायमस्वरूपी दिव्यांग प्रमाणपत्र मिळत नसल्याने अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे सिकलसेल रुग्णांना कायमस्वरूपी ४० टक्के अपंगत्वाचे प्रमाणपत्र देण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली . सदर मागणीचे निवेदन बहुजन मेडिकोज असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी. सिव्हिल सर्जन महादेव चिंचोले यांना दिले.

शासकीय रुग्णालय चंद्रपूर यांना एका निवेदनाद्वारे केली या निवेदनाला जिल्हा शल्य चिकित्सकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे व लवकरच कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे. यावेळी बहुजन मेडिकोज असोसिएशनचे प्रतिनिधी डॉ.अभिलाषा गावतुरे,डॉ. बंडू रामटेके, डॉ. राजू ताटेवार डॉ.राकेश गावतुरे, डॉ. राकेश वनकर ,डॉ. समृद्धी वासनिक आदी उपस्थित होते.



**बरेच रुग्ण वयाच्या विसी मध्ये आणि तिशी मध्ये या आजाराला बळी पडतात आणि त्यांना आपला जीव गमवावा लागतो. चंद्रपूर हे देशातील सर्वाधिक बाधित क्षेत्रांपैकी एक आहे, ज्यामध्ये मोठ्या संख्येने रुग्ण या दुर्धर आजारामुळे बळी पडतात त्यामुळे अशा रूग्णांना कायमस्वरूपी अपंगत्वाच्या ४०टक्के पेक्षा जास्त अपंगत्वाचे प्रमाणपत्र द्यावे , वेळेवर आणि दर्जेदार वैद्यकीय उपचार मिळावेत या अशी मागणी आम्ही निवेदनाद्वारे केली आहे . –डॉ.अभिलाषा गावतुरे**

## चिमूर तालुक्यात विविध समस्यांचा डोंगर

### मागण्यासाठी वंचित चे धरणे आंदोलन





**चिमूर | प्रतिनिधी**

वंचित बहुजन आघाडी चे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांचे सुचनेनुसार चिमूर तालुका वंचित बहुजन आघाडी च्या वतीने शुक्रवार ला दुपारी तहसील कार्यालयासमोर आदिवासी व गैर आदिवासी जबरानजोत धारकांच्या न्याय हक्कासाठी व विविध मागण्यांकरिता एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मार्गदर्शक माजी राज्य मंत्री तथा वंचित बहुजन आघाडी चे विदर्भ प्रमुख डॉ. रमेश कुमार गजबे हे होते. डॉक्टर गजबे म्हणाले की, जनतेच्या न्याय हक्कासाठी वंचित बहुजन आघाडी चे पाठिसी राहणे काळाची गरज आहे. विदर्भ समन्वयक अरविंद सांदेकर म्हणाले की, या विधान सभा क्षेत्रातील आमदार विधान सभेत विधान सभा क्षेत्रातील समस्या, मागण्या लावून धरत नाही. विकासाच्या नावावर अजूनही चिमूर विधान सभा क्षेत्र मागासलेले आहे. या आंदोलना दरम्यान अनेक वंचितच्या नेत्यांनी मार्गदर्शन केले.

ओबीसीची जाती निहाय जनगणना करून त्यांचे आरक्षण वाढवावे, विजेचा दर कमी करण्यात यावा, बँकानी तात्काळ शेतकऱ्यांना कर्ज देण्यात यावे, तालुक्यातील महिलांच्या हाताला काम द्यावे, शेतकऱ्यांना शेतमजूरांना संरक्षण द्यावे, वन्य प्राण्यापासून किंवा नैसर्गीक हानी झाल्यास शेतकरी व शेतमजुरांना लाभ देण्यात यावा. शेत मालाला हमी भाव देण्यात यावा, आदी मागण्याचे निवेदन उपविभागीय अधिकारी किशोर घाडगे यांचे मार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठविण्यात आले.

यावेळी माजी राज्य मंत्री तथा वंचित बहुजन आघाडी चे विदर्भ पमुख डॉ. रमेश कुमार गजबे, विदर्भ समन्वयक अरविंद सांदेकर, जिल्हा कार्याध्यक्ष जयदीप खोबागडे, जिल्हा समन्वयक डॉ. प्रेमलाल मेश्राम, एन आर कांबळे, युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष शुभम मंडपे, ज्ञानेश्वर नागदेवते, शालीक थुल, महिला आघाडीचे जिल्हाध्यक्ष कविता गौरकर, तालुका अध्यक्ष डॉ बाळासाहेब बन्सोड, ॲड संजीवनी सातारडे, जर्नाधन खोब्रागडे,आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. या निवेदनाच्या प्रतिलीपी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, विरोधी पक्षनेता विजय वडेट्टीवार यांना पाठविण्यात आल्या.

## पूरग्रस्तांना संतोषसिंह रावत यांचा मदतीचा हात



**मूल | प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यात मागील आठ दिवसापासून संततधार सुरू आहे. जिल्ह्यात पडलेल्या मुसळधार पावसाने चिचपल्ली येथिल तलावाची पार फुटल्याने संपूर्ण गावात पावसाचे पाणी शिरले होते. यामुळे चिचपल्ली गावातील असंख्य कुटुंबाचे मोठे नुकसान झाले. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा सीडीसीसी बँकेचे अध्यक्ष संतोष सिंह रावत व काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी चिचपल्ली, पिंपळखुट येथील नुकसानग्रस्त कुटुंबांना ब्लँकेटचे वाटप केले तसेच चिचपल्ली येथील नुकसानग्रस्त नागरिकांना जेवणाची सोय करून दिली.

ज्या कुटुंबाची मोठी आर्थिक हानी झाली अशा कुटुंबांना संतोषसिंह रावत यांनी आर्थिक मदतही केली. प्रशासकीय स्तरावरून पुन्हा मदत मिळवण्यासाठी पाठपुरावा करून प्रयत्न करणार असेही आश्वासन नुकसानग्रस्त कुटुंबाला रावतयांनीदिल

## राजश्री शाहू महाराज जेष्ठ साहित्यिक व कलावंतांचे अर्ज सादर करण्याचे आवाहन

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

राजर्षी शाहू महाराज जेष्ठ साहित्यिक व कलावंत यांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहे. तरी सर्व पात्र लाभार्थ्यांनी https://mahakalasanman.org/pge-pplication Form ForUser.aspx या संकेत स्थळावर जावून अर्ज करावे व ऑनलाईन केलेले अर्ज आणि संबंधित दस्ताऐवज अर्जधारकांनी आपल्या तालुक्यातील पंचायत समितीमध्ये सादर करावेत, असे आवाहन जिल्हा समाजकल्याण अधिकारी तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं.) जिल्हा परिषद यांनी केले आहे.

# कलेक्टर आणि सीईओ ! भर पावसात धानाच्या शेतात

## चिखल तुडवत यांत्रिकी आणि पारंपरिक पध्दतीने भाताची रोवणीर







**मूल । प्रतिनिधी**

चंद्रपूर हा धान उत्पादक जिल्हा आहे. खरीप हंगामात जिल्ह्याचे सर्वसाधारण लागवड क्षेत्र ४ लक्ष ५८ हजार हेक्टर असून यापैकी १ लक्ष ८८ हजार हेक्टरवर (३५ टक्के) भाताचे पीक घेतले जाते. सद्यस्थितीत जिल्ह्यात मुसळधार पावसाने हजेरी लावली असल्याने धानाच्या रोवणीने जोर पकडला आहे. अशातच जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांनी भर पावसात धानाच्या शेतात हजेरी लावून चिखल तुडवत यांत्रिकी आणि पारंपरिक पध्दतीने धानाची रोवणी केली.

मूल तालुक्यातील चिखली येथील प्रमोद कळसकर यांच्या शेतात यांत्रिक पद्धतीने भात लागवड प्रात्यक्षिक करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, मुलचे उपविभागीय अधिकारी विशालकुमार मेश्राम, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार व इतर अधिकारी प्रत्यक्ष बांधामध्ये उतरले. यावेळी त्यांनी स्वतः रोवणी यंत्र हाताळून यांत्रिक पद्धतीने तसेच पारंपरिक पद्धतीने भात रोवणी केली. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी यांत्रिकी पद्धतीने भाताची रोवणी कशी करतात याबद्दल तसेच यांत्रिक पद्धतीने तयार केलेले भात रोपाचे केक तयार करण्याची पध्दत जाणून घेतली. पारंपरिक पद्धतीने भात लागवड केली तर प्रति एकर चार ते साडेचार हजार रुपये रोवणीचा खर्च येतो, मात्र यांत्रिकी पद्धतीने रोवणी केली तर एका दिवसात दोन एकर रोवणी करता येते. व एका एकराला जास्तीत जास्त एक हजार रुपये खर्च येतो. त्यामुळे मजुरीची बचत होते आणि खर्च कमी होऊन उत्पादनात वाढ होते. भात रोवणी यंत्राची किंमत ४ लक्ष रुपये असून शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानावर उपलब्ध आहे. यांत्रिकी पद्धतीने भाताची रोवणी केल्यास योग्य अंतरावर लागवड होते. त्यामुळे पिकास योग्य प्रमाणात हवा, सूर्यप्रकाश मिळतो. परिणामी भाताचे फुटवे जास्त येतात, बियाणे कमी लागते व उत्पादनात वाढ होते.यावेळी कृषि उपसंचालक चंद्रकांत ठाकरे, उपविभागीय कृषी अधिकारी श्री.व्यवहारे, मूलच्या तहसीलदार मृदुला मोरे, तालुका कृषी अधिकारी भास्कर गायकवाड, गट विकास अधिकारी श्री. राठोड व कर्मचारी उपस्थित होते.

### तालुक्यातील इतरही ठिकाणी भेटी :

**यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी ग्रामपंचायत मारोडा येथील सोमनाथ ॲग्रो टुरिझम पर्यटन केंद्राला भेट देऊन पाहणी केली व येथील उपस्थितांच्या समस्या जाणून घेतल्या. सोबतच सोमनाथ येथील गोसदन प्रकल्प, मारोडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र, गोबर्धन प्रकल्पास भेट देऊन प्रकल्पाची माहिती घेतली. यावेळी संध्या गुरनुले, मारोडा येथील सरपंच व सदस्य, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे उप विभागीय अधिकारी, बांधकाम विभागाचे उप विभागीय अधिकारी, कृषी विभागाचे अधिकारी, आरोग्य विभागाचे अधिकारी, मंडळ अधिकारी, पंचायत समितीचे विस्तार अधिकारी यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरीक उपस्थित होते.**

# दिव्यांग विद्यांर्थ्यांसोबत शिवसेना पदाधिकाऱ्यांनी केला उद्धव ठाकरे यांचा वाढदिवस साजरा

## वरोरा–भद्रावती विधानसभेत ठिकठिकाणी केले अल्पोहाराचे वाटप



**वरोरा । प्रतिनिधी**

शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचा वाढदिवस जिल्हाप्रमुख तथा वरोरा भद्रावती विधानसभा प्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या मार्गदर्शनात शिवसेना पदाधिकाऱ्यांनी दिव्यांग,मुकबधीर,अंध विद्यार्थी तसेच रुग्णांना अल्पोहर वाटप करून साजरा करण्यात आला. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हाप्रमुख तथा विधानसभा प्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या मार्गदर्शनात वरोरा – भद्रावती विधानसभेत विविध सामाजिक उपक्रम राबविले जात आहे. दिनांक २७ जुलै रोजी आनंदवन येथील अंध मुकबधीर, कर्णबधीर विद्यार्थांन सोबत वाढदिवस साजरा करत त्यांना अल्पोहराचे वाटप केले.तसेच येथील आनंदवन रुग्णालयातील रुग्णाची विचारपुर करत त्यांना सुद्धा अल्पोहार वाटप करण्यात आला.

यासोबतच भद्रावती ग्रामीण रुग्णालय, गजानन महाराज मतिमंद विद्यालय तसेच प्रेरणा अंध विद्यालय निंबाळा येथील विद्यार्थ्यांना आल्पोहर वाटप केले.यावेळी उपजिल्हा प्रमुख अमित निब्रड, विधानसभा संघटक सुधाकर मिलमीले, शिवदूत बंडू डाखरे, माजी नगरसेवक दिनेश यादव,माजी नगरसेवक किशोर टिपले, शहर प्रमुख संदीप मेश्राम,उपशहर प्रमुख मनीष दोहतरे,ज्येष्ठ शिवसैनिक अनिल गाडगे,महेश जिवतोडे, युवासेना विधानसभा समन्वयक निखिल मांडवकर, माजी नगरसेविका शुषमा भोयर, वंदना डाखरे,कीर्ती पांडे, बंडू चटपल्ली,जितेंद्र गुल्हानी, अरविंद खोबरे,राजू खबाने,शंकर ठाकरे, वैभव डाहुले व आदी उपस्थित होते.

# आज सोलापुरात जुन्या पेन्शन साठी आक्रोश मोर्चा

## महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना आक्रमक

**करमाळा । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना गेल्या अनेक वर्षापासून राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांना सरसकट पेन्शन योजना लागू करावी यासाठी प्रयत्न करत आहे,लढत आहे परंतु आजपर्यंतच्या लढ्यात फक्त आणि फक्त आश्वासने मिळाली आहेत आणि त्यामुळेच येत्या काळामध्ये महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना महाराष्ट्रात सर्व कर्मचाऱ्यांना सरसकट जुनी पेन्शन सुरू करावी या एकमेव मागणीसाठी सर्व जिल्हा परिषदेवर पेन्शन मोर्चाचे आयोजन करत आहेत. त्या अनुषंगाने रविवार दिनांक २८ जुलै रोजी सोलापूर जिल्हा परिषदेवर पेंशन आक्रोश मोर्चा चे आयोजन केले आहे.

या आंदोलनाचा उद्देश फक्त एवढाच आहे की शासनाने आता हा विषय गांभीर्याने घेण्याची गरज आहे कर्मचारी गेल्या अनेक वर्षांपासून जुनी पेन्शन ची मागणी करत आहे परंतु शासनाने या न त्या प्रकारे फक्त आश्वासने दिली आहेत प्रत्यक्षात मात्र काहीही मिळाले नाही.आणि त्याचाच परिणाम म्हणून लाखोंच्या संख्येने कर्मचारी आंदोलने करीत आहेत तेव्हा या विषयाला आता शासनाने गांभीर्याने घेण्याची गरज आहे आणि राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांना सरसकट जुनी पेन्शन योजना लागू करण्याची गरज आहे तेव्हाच हे वादळ थांबेल.

रविवार दिनांक २८ जुलै रोजी सोलापूर येथे होणाऱ्या पेन्शन आक्रोश मोर्चा मध्ये जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कर्मचाऱ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हा नेते तात्यासाहेब जाधव यांनी केले आहे .

# नक्षल सप्ताहाच्या पूर्वसंध्येला जहाल महिला नक्षलीचे आत्मसर्पण




**विकासकामांना आडकाठी निर्माण करणाऱ्या नक्षल्यांवार पोलीस दल सक्षमपणे कारवाई करण्यास तत्पर असुन, जे नक्षली विकासाच्या प्रवाहात सामील होण्यास ईच्छुक असतील त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच लोकशाहीतील सन्मानाचे जीवन जगण्यासाठी गडचिरोली पोलीस दल सर्वतोपरी मदत करेल, तसेच त्यांनी हिंसेचा त्याग करुन शांततेचा मार्ग स्विकारावा.असे आवाहन पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी केले.**

**गडचिरोली । प्रतिनिधी**

नक्षल्यांच्या गडचिरोली विभागाला संपूर्ण साहित्य पोहचविण्याची जबाबदारी असलेल्या तसेच चकमक व खूनामधे प्रत्यक्ष सहभाग असलेल्या जहाल महिला नक्षलीने हिंसात्मक वाट सोडून गडचिरोली पोलीस दलासमोर शनिवार २७ जुलै रोजी आत्मसमर्पण केले आहे. रिना बोर्रा नरोटे ऊर्फ ललीता, कमांडर, टेलर टिम, गडचिरोली डिव्हीसी (वय ३६) रा. बोटनफुंडी, ता. भामरागड, जि. गडचिरोली असे आत्मसमर्पण केलेल्या नक्षलीचे नाव आहे.



आत्मसमर्पण केलेल्या रिना बोर्रा नरोटे ऊर्फ ललीता ही २००६ मध्ये पेरमिली दलममध्ये भरती झाली. २००७ पासुन सप्लाय टिम सदस्य म्हणुन काम करण्यास तिने सुरुवात केली. २००७ – २००८ मध्ये शिवणकला, कापड कटींग व शिलाई मशिन चालविण्याचे तिने प्रशिक्षण घेतले. २००८ – १४ मध्ये टेलरींग टिममध्ये सदस्य पदावर कार्यरत होती. २०१४ मध्ये टेलर टिममध्ये कमांडर पदावर बढती होऊन आजपर्यत ती कार्यरत होती. दरम्यान २०२० मध्ये पेरमिली भट्टी जंगल परिसरात झालेल्या चकमकीमध्ये तिचा प्रत्यक्ष सहभाग होता. तसेच मध्ये नैनवाडी जंगल परिसरात झालेल्या एका इसमाच्या खुनात तिचा प्रत्यक्ष सहभाग होता.महाराष्ट्र शासनाने रिना बोर्रा नरोटे ऊर्फ ललीता हिचेवर ०८ लाख रुपयाचे बक्षिस जाहिर केले होते. आत्मसमर्पणानंतर पुनर्वसनाकरीता केंद्र व राज्य शासनाकडुन रिना बोर्रा नरोटे ऊर्फ ललीता हिला एकुण ५.५ लाख रुपये बक्षिस जाहिर केले आहे. गडचिरोली पोलीस दलाने अतिशय प्रभावीपणे नक्षलविरोधी अभियान राबविल्यामुळे तसेच शासनाने नक्षल्यांना आत्मसमर्पणाची सुवर्णसंधी उपलब्ध करुन दिल्याने, सन्मानाने जीवन जगण्यासाठी २०२२ ते २०२४ सालामध्ये आतापर्यंत एकुण २३ जहाल नक्षल्यांनी आत्मसमर्पण केले आहे. सदर महिला नक्षलीची आत्मसमर्पण घडवून मुख्यप्रवाहात आणण्याबाबतची कारवाई संदिप पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक (नक्षलविरोधी अभियान) नागपूर, अंकित गोयल, पोलीस उप–महानिरीक्षक गडचिरोली परिक्षेत्र, अजय कुमार शर्मा, पोलीस उप–महानिरीक्षक (अभियान) सीआरपीएफ, नीलोत्पल, पोलीस अधीक्षक गडचिरोली व शंभु कुमार, कमांण्डट ०९ बटा. सिआरपीएफ यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडली. विशेष म्हणजे २८ जुलै ते ३ ऑगस्ट दरम्यान नक्षलवादी शहीद सप्ताह पाळतात. सप्ताहाच्या पूर्वसंध्येलाच जहाल महिला नक्षलीने गडचिरोली पोलीस दलासमोर आत्मसमर्पण केले आहे.

### ६७१ नक्षल्यांनी केले गडचिरोली पोलीस दलासमोर आत्मसमर्पण

**शासनाने सन २००५ पासून जाहिर केलेल्या आत्मसमर्पण योजनेमुळे तसेच हिंसाचाराच्या जीवनाला कंटाळून वरिष्ठ नक्षल्यांसह अनेक जहाल नक्षल्यांनी आजपर्यंत पोलीसांसमोर आत्मसमर्पण केलेले आहे. त्याचबरोबर आत्मसमर्पित नक्षल्यांचे पोलीस दलाने पुनर्वसन घडवून आणल्यामुळे आजपर्यंत एकुण ६७१ नक्षल्यांनी गडचिरोली पोलीस दलासमोर आत्मसमर्पण केले आहे हे विशेष.**

# एका अधिकाऱ्याची अशीही कार्यतत्परता..

## चक्क बोटीने जलप्रवास करत केली नुकसानग्रस्त शेतीची पाहणी

## अप्पर जिल्हाधिकारी विजय भाकरे यांचा शेतकऱ्यांशी संवाद



**गडचिरोली । प्रतिनिधी**

गडचिरोली जिल्ह्यात गेल्या सहा–सात दिवसापासून मुसळधार पावसामुळे आणि धरणातून मोठ्या प्रमाणात विसर्गामुळे नदी नाल्यांना पूर आला आहे.चपराळा पासून पुढे सिरोंचा पर्यंत वाहणाऱ्या प्राणहिता नदीला देखील मोठ्या प्रमाणात पूर आलेला आहे. पुराचा पाणी शेतात शिरल्यामुळे अनेकांची शेती पाण्याखाली गेली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त शेतीची पाहणी करण्याकरिता अहेरीचे अपर जिल्हाधिकारी विजय भाकरे हे अहेरी तालुक्यातील मोदुमतुरा गावात पोहोचले. यावेळी शेतीला नदीचे स्वरूप आल्याचे दिसले.गावकऱ्यांच्या मदतीने त्यांनी चक्क बोटीच्या साहाय्याने शेतीची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी उपविभागीय कृषी अधिकारी आनंद गंजेवार, तालुका कृषी अधिकारी संदेश खरात तसेच कृषी विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

प्राणहिता नदीला पूर आल्याने नदी काठावर वसलेल्या अनेक गावांमध्ये पुराचे पाणी शिरलं आहे. चिंचगुंडी, आबनपल्ली, वेंकटरावपेटा, इंदाराम, मोदुमतुरा,देवलमरी, काटेपल्ली, कोलपल्ली,वट्रा, लंकाचेन,महागाव, वांगेपल्ली, बोरी, वडलापेठ ,रामपूर,राजपूर पॅच, टिकेपल्ली यासह परिसरातील आदी गावांना याचा फटका बसला आहे. यासह आदी गावातील शेतकऱ्यांची शेती पूर्णपणे पाण्याखाली गेली आहे. या भागात धानाचे नुकसान नसले तरी कापसाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे नागरिकांनी सांगितले आहे.शुक्रवारी २६ जुलै रोजी अपर जिल्हाधिकारी विजय भाकरे यांनी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना सोबत घेऊन देवलमरी परिसरातील आदी गावांना भेटी देऊन प्रत्यक्ष नुकसानग्रस्त शेतीची पाहणी करण्यासाठी गेले असता.मोदुमतुरा गावात त्या प्रमाणात शेतातच पाणी साचल्याचे दिसून आले. एवढेच नव्हे तर देवलमरी कडे जाणाऱ्या रस्त्यावर देखील मोठ्या प्रमाणात पाणी साचला होता. शेतकऱ्यांनी यावेळी बोटीची व्यवस्था करून प्रत्यक्ष शेवटचा टोकापर्यंत पाहणी करण्याची विनंती केली. शेतकऱ्यांच्या विनंतीला मान देऊन स्वतः विजय भाकरे यांनी बोटीच्या सहाय्याने जल प्रवास संपूर्ण परिसरच पिंजून काढला. त्यानंतर या भागातील शेतकऱ्यांशी संवाद साधून कुठल्या पिकांची लागवड केली याबाबत माहिती जाणून घेतली.

**मागील पाच ते सहा दिवसापासून जिल्ह्याच्या दक्षिण भागात अतिवृष्टी निर्माण झाल्याने प्राणहिता नदी काठावरील गावांना भेटी देऊन नुकसानग्रस्त शेतीची पाहणी करण्यात आली. शेतकऱ्यांच्या आग्रहास्तव व त्यांच्या मदतीने बोटीच्या सहाय्याने शेतात साचलेल्या पाण्यात जाऊन नुकसानीची पाहणी करण्यात आली. येथे शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात शेती पाण्याखाली गेल्याचे आढळले. त्वरित कृषी विभागाला पंचनामे करून तात्काळ शेतकऱ्यांना शासनाची मदत देण्याचे निर्देश देण्यात आले**
**–विजय भाकरे,अप्पर जिल्हाधिकारी, अहेरी**

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .